# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 09/11/2021 (मंगळवार)
(सायंकाळ)

---

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 08 कि. मी. अंतरावरील खानगाव जवळ काटोल येथे दिनांक 08/11/2021 चे 06:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजु रामरावजी ढाले, वय 51 वर्ष, रा. पंचवटी काटोल हा त्याचे सायकलवर पत्नीला बसवुन शेतातुन काटोल कडे घरी जात असता एमएच–40/एफसी– 2811 क्रमांकाची मोटरसायकलचा चालक/मृतक नामे– पवन नारायण रेवतकर वय 43 वर्ष रा. देशमुख ले आउट काटोल याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे सायकल मागुन धडक दिली. या अपघातात फिर्यादी व फिर्यादीची पत्नी खाली पडले व जखमी झाले व आरोपीस ग्रामीण रूग्णालय काटोल येथे नेले असता आरोपी हा ग्रामीण रूग्णालय काटोल येथे मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री आगासे मो. नं. 8446283925 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. सावनेर – दिनांक 06/11/2021 चे 17.30 वा. ते दिनांक 07/11/2021 चे 02.30 वा. चे सुमारास पो. स्टे. सावनेर हद्दीत फिर्यादीयांची 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी हि शेतातुन घरी जाण्यास निघाली असता ती घरी पोहचली नाही अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सोवनर येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री कारंडे हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यु

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 4 कि. मी. अंतरावरील मौजा मदना शेत शिवार येथे 07/11/21 चे 13.00 ते 21.00 वा. सुमारास जय गोर्वधन जाने (मृतक), वय 19 वर्ष, रा. मदना. ता.नरखेड हा शेतात जातो म्हणुन शेतात निघून गेला. रात्री घरी परत न आल्याने फिर्यादी यांनी 21.00 वा. शेतात जावून पाहिले असता मृतक हा पर्हाटीचे शेतामध्ये मृत अवस्थेत दिसला. त्याचे तोंडातून फेस निघत होता त्याचे जवळ पॉयजनची बॉटल दिसून आली मृतक याने अज्ञात कारणावरुन विषारी औषध प्राशन करुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गोर्वधन श्रावन जाने, वय 51 वर्ष, रा. मदना. ता.नरखेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार संजय रिधोरकर मो.न.8007671986 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 0.5 कि. मी. अंतरावरील मौजा कुही येथे दिनांक 08/11/2021 चे 09.00 वा. ते 18.30 वा. फिर्यादीचे कुही येथे कापडाचे दुकान असून फिर्यादी घरी पुजा करण्याकरीता 06.30 वा. गेले असता त्यांचा मुलगा नामे– त्रृषभ उदेभान धनजोडे (मृतक), वय 20 वर्ष, रा. वार्ड क्र.1 आझाद चौक कुही. ता.कुही जि. नागपूर हा स्वयंपाकखोली मध्ये दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– उदयभान नामदेवराव धनजोडे वय 49 वर्ष रा.वार्ड क्र.1 आझाद चौक कुही. ता. कूही जि. नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार गुटखे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर